संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# निवडणुकीतील झेंडे आणि छुपे अजेंडे

**निवडणुकीचा** अखेरचा टप्पा सुरु झालेला आहे. परंतु संपूर्ण निवडणूक प्रचार काळामध्ये ज्या काही गोष्टी ठळकपणे समोर आल्या त्यावरून लोकशाहीतला हा सर्वात मोठा महोत्सव पैशाची वारेमाप उधळण करणारा महोत्सव असल्याचे तसेच काळा पैसा पांढरा करण्यासाठी एक सर्वात मोठी संधी असल्याचे सिध्द होत आहे. प्रचारकाळामध्ये ज्या काही अवैध रोकड रकमा सापडल्या त्याचा यावेळी विक्रम नोंदला गेला आहे. जवळपास चार हजार कोटींच्या रोकड रकमा जप्त झाल्या परंतु अगदी अलिकडच्या ताज्या माहितीप्रमाणे पाकिस्तानकडून बनावट नोटा घुसवण्याचा तितकाच मोठा प्रयत्न या काळात झाल्याचे समोर आले आहे. मतांसाठी पैसा वाटप करताना त्यात या बोगस नोटांचा समावेश केला गेला. आणि ही बोगस नोटांची रक्कमही बरीच मोठी असल्याचे संबंधित सूत्रांचे म्हणणे आहे. म्हणजेच लोकशाहीतली निवडणूक नावाची सर्वात मोठी प्रक्रिया मनी आणि मसल महोत्सव असल्याचे या सगळ्या प्रकारांवरून सिध्द होते. नोटबंदी झाल्यानंतर देशातील काळा पैसा संपेल अशा वल्गना केल्या गेल्या. परंतु निवडणूक काळामध्ये ज्या पध्दतीने पैसा वापरला गेला तो पाहिल्यानंतर काळा पैसा अजूनही तितक्याच मोठ्या प्रमाणात कायम असल्याचे सिध्द होते. एवढेच नव्हे तर निवडणुकीची संधी साधून काही विशिष्ट संघटना समांतर चलन किंवा बनावट नोटा चलनामध्ये घुसवलेल्या दिसून येतात. सामान्य माणसाच्या एकूणच लोकशाही किंवा निवडणूक विषयीच्या कल्पना अतिशय साधारण स्वरुपाच्या असतात. या देशाचा राज्यकारभार चालवण्याकरीता काही उमेदवारांना निवडून देणे आणि त्यासाठी मतदान प्रक्रिया राबवली जाते. राजकीय पक्ष आपापल्या उमेदवारांचा प्रचार करत असतात. परंतु यापेक्षाही बऱ्याच मोठ्या लबाड्या आणि कुरघोड्या या निवडणूक काळात घडतात की ज्याचा सामान्य माणसाला थांगपत्ता नसतो. आपल्या देशाने लोकशाही पध्दती स्वीकारली आहे. आणि संविधानाने या लोकशाही प्रक्रियेअंतर्गत निवडणूक लढवण्याची एक विशिष्ट पध्दत आखून दिलेली आहे.

### लोकशाही नव्हे मनी महोत्सव

धोरणात्मकदृष्ट्या ही एक विशिष्ट प्रक्रिया जरी राबवली जात असली तरी त्या प्रक्रियेचा अनेक कारणांसाठी कसा उपयोग केला जाऊ शकतो याचे धडधडीत उदाहरण म्हणून निवडणुकांकडे पाहाता येते. उदाहरण म्हणून असे आढळून आले आहे की काही उमेदवार काही विशिष्ट कंपन्यांकडून संस्थांकडून किंवा धनाढ्य व्यक्तींच्या पाठिंब्यावर उभे केले जातात. त्याच्या प्रचार काळामध्ये या श्रीमंतांकडे असलेला काळा पैसा पांढरा करण्याचा प्रयत्न होतो. शिवाय अशा अनेक व्यक्ती निवडून येण्यासाठी प्रयत्न केले जातात आणि मग या धनाढ्यांच्या पाठिंब्यावर निवडून येणारा हा गट सरकार दरबारी स्वतःचे प्रस्थ निर्माण करतो आणि त्याला पाहिजे ती धोरणे राबवून घेण्यासाठी सर्व प्रकारचे मार्ग अवलंबतो. म्हणजे देशामध्ये काही प्रकल्प जाणीवपूर्वक उभे करण्यासाठी दबाव निर्माण करण्यापासून ते विशिष्ट प्रकारची शस्त्रसामुग्री खरेदी करण्यास भाग पाडण्यापर्यंतचे काम हा गट करीत राहातो. म्हणजे काळा पैसा पांढरा करणे, बनावट नोटा चलनात आणणे सरकारच्या धोरणांवर प्रभाव टाकणारा गट निवडून आणणे. काही परदेशी कंपन्यांशी संधान साधून कंत्राटे मंजूर करण्याकरीता अनेक प्रकारचे डावपेच खेळले जाणे असे हे अनेक प्रकार निवडणुकीच्या निमित्ताने होत असतात ज्याची तुमच्या आमच्यासारख्या माणसाला कल्पनाही येऊ शकत नाही. दिल्लीचे राजकीय वातावरण हा एक वेगळ्याच दुनियेचा प्रकार मानला जातो. इथल्या अनेक मंत्रालयांच्या बड्या अधिकाऱ्यांचा अनेक वेगवेगळ्या कंपन्यांशी असलेला घनिष्ट संबंध हासुध्दा सरकारची धोरणे तयार करण्याच्या प्रक्रियेवर फार मोठा प्रभाव टाकत असतो. किंबहुना नव्या सरकारकडून विशिष्ट प्रकारची कामे करून घ्यायची आहेत याचाही अजेंडा आधीच तयार झालेला असतो.तो अजेंडा राबवण्याकरिता आपल्याला अनुकूल असे प्रतिनिधी निवडून कसे येतील यासाठी तितकीच मोठी खेळी खेळली जाते. म्हणूनच जिला आपण लोकशाही प्रक्रिया म्हणतो ती फार कायदेशीर पध्दतीने किंवा फार मोठ्या व्यापक उद्दीष्टांनी परिपूर्ण आहे असे समजण्याचे कारण नाही.

### तर ती चुकीची समजूत

स्वातंत्र्याच्या केवळ सत्तर वर्षामध्ये लोकशाही व्यवस्थेचे जे परिणाम समोर येताना दिसतात ते भयावह म्हणावे लागते. निवडणुकीला लोकशाहीचा महोत्सव म्हणणे हा केवळ देखावा असतो. अगदी असे धाडसाने म्हणता येऊ शकते की निवडणुकीला उभे राहिलेल्या प्रत्येक उमेदवाराचा छुपा अजेंडा खूप वेगळा असतो. तो मुळातच जनतेसाठी निवडणूक लढत नसतो आणि जनतेसाठी निवडून येण्याची त्याची इच्छाही नसते. तो काही विशिष्ट गटाच्या पाठिंब्यावर निवडणुकीला उभा राहतो आणि त्या गटाचे भले करण्याकरीता यंत्रणेलाही राबवत राहातो. म्हणूनच निवडणूक काळात प्रचंड रोख रक्कम सापडणे किंवा बनावट नोटांच्या प्रसाराचा कट उघडकीला येणे या दोन्ही गोष्टी लोकशाहीचे धिंडवडे काढणाऱ्या असतात. इतकी निवडणूक काळात गैरव्यवस्था किंवा गैरप्रकार माजत असतील आणि तरी त्याला आपण लोकशाहीचा महोत्सव म्हणणार असू तर ते आश्चर्यकारकच म्हणावे लागेल. निवडणुकांचे हे छुपे अजेंडे ओळखण्याची तयारी मतदारांनी दाखवली पाहिजे. याचा अर्थ निवडणूक कोणी लढवावी. का लढवावी यामागचे उद्दीष्ट तपासणारी व्यवस्था निर्माण करावी लागेल. संविधानाने दिलेल्या अति स्वातंत्र्याचा निवडणुकीमध्ये किंवा निवडणुकीच्या निमित्ताने सर्वाधिक गैरवापर होताना दिसून येतो. थोडक्यात सांगायचे तर व्यापक जनहित हे काही निवडणूक प्रक्रियेचे उद्दीष्ट नाही. हे अतिशय स्पष्ट आहे. राजकीय पक्षांचे स्वतःचे झेंडे आणि त्यातल्या उमेदवारांचे छुपे अजेंडे हे निवडणुकीचे आजचे स्वरूप झालेले आहे.